RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष १, अंक १२] बुधवार, फेब्रुवारी २५, २०१५/फाल्गुन ६, शके १९३६ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३४

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ फेब्रुवारी २०१५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए.०८१३/प्र.क्र.१४१/राउशु.–२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये सुधारणा करण्यास व ते तात्काळ अंमलात आणण्याचे ठरविले आहे व त्याअर्थी ते प्रसिद्ध न करता महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम १४३ च्या उप कलम (३) च्या परंतुकानुसार पूर्वीच्या प्रकाशनाचा वापर न करता प्रसिद्ध करण्यात यावेत.

उक्त महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम १४३ च्या उप कलम (२) च्या परंतुकासह पोट-कलम (२) च्या खंड (*b*) (*f*) आणि (*k*) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तयार करीत आहे ते असे :—

१. या नियमांना " महाराष्ट्र विदेशी मद्य (सुधारणा) नियम, २०१५ " असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम २५ मध्ये (यापुढे यास प्रधान नियम असे संबोधावे).

(अ) उप नियम (२) मध्ये,—

(*i*) खंड (*b*) मध्ये " कोणत्याही शैक्षणिक अथवा धार्मिक संस्थेपासून " या शब्दांनंतर " किंवा कोणतेही राष्ट्रीय व्यक्तीमत्त्वाचा पुतळा " हे शब्द समाविष्ट करण्यात यावे.

(*ii*) स्पष्टीकरणामध्ये परिच्छेद (*iii*) मध्ये,

(१) खंड (*b*) मध्ये " किंवा वाहनतळ " या ऐवजी " किंवा वाहनतळ, किंवा " हे शब्द अंतर्भूत करण्यात यावे.

(२) खंड (*b*) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात यावा, तो असा.—

(c) जर संरक्षक भिंत असल्यास पुतळ्या जवळील प्रवेशद्वाराचा मध्य बिंदू आणि जर संरक्षक भिंत नसल्यास पुतळ्याच्या चौथऱ्याचा मध्य बिंदू."

(*iii*) स्पष्टीकरणामध्ये, खंड (*c*) नंतर पुढील परिच्छेदाचा समावेश करण्यात यावा, तो असा,—

“ (*iv*) “ राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा पुतळा ” म्हणजे शासन मान्यताकृत असलेला कोणताही राष्ट्रपुरूष /थोर व्यक्ती यांचा पुतळा जो या नियमासोबतच्या अधिसूचीमध्ये विषद करण्यात आलेला आहे.”

(B) उप नियम (३) मध्ये, खंड (*a*) मध्ये “ कोणतीही संस्था संबोधलेले ” या शब्दानंतर “ आणि कोणताही राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा पुतळा ” हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

३. प्रधान नियमामधील नियम ४५ मध्ये, उप नियम (१C) मध्ये—

(*i*) “ कोणताही राष्ट्रीय अथवा राज्य महामार्ग ” या शब्दांनंतर “ किंवा राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा ” हे शब्द समाविष्ट करण्यात यावे.

(*ii*) परंतुकामध्ये, “ मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, १९९० ” या शब्दांनंतर “ आणि मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम २०१५ ” हे शब्द समावेश करण्यात यावेत.

(*iii*) स्पष्टीकरणामध्ये,—

(*a*) परिच्छेद (*iii*) मध्ये,—

(१) खंड (*c*) मध्ये वाक्याच्या शेवटी “ किंवा ” हा शब्द समाविष्ट करावा.

(२) खंड (*c*) नंतर पुढील खंड समाविष्ट करावा, तो असा -

(*d*) जर पुतळ्याभोवती संरक्षक भिंत असल्यास पुतळ्याजवळील प्रवेशद्वारा चा मध्य बिंदू आणि जर संरक्षक भिंत नसल्यास पुतळयाच्या चौथऱ्याचा मध्य बिंदू ”.

(*b*) परिच्छेद (*iii*) नंतर पुढील परिच्छेद समाविष्ट करावा, तो असा -

(*iv*) “ राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा ” म्हणजे शासन मान्यताकृत असलेला कोणताही राष्ट्रपुरूष /थोर व्यक्ती यांचा पुतळा जो या नियमासोबतच्या अधिसूचीमध्ये विषद करण्यात आलेला आहे.”.

४. प्रधान नियमामध्ये, फॉर्म एफ. एल. ३ नंतर पुढील अधिसूची अंतर्भूत करण्यात यावी.

**“ अधिसूची**

[नियम २५(२) आणि ४५ (१ सी) पहावा]

**१. राष्ट्रीय व्यक्तीमत्त्वाचे पुतळे**

१. महात्मा फुले
२. लोकमान्य टिळक
३. महात्मा गांधी
४. पंडीत जवाहरलाल नेहरु
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर
६. विनोबा भावे
७. संत तुकडोजी महाराज
८. स्वातंत्र्यवीर सावरकर
९. स्वामी रामानंद तिर्थ
१०. इंदीरा गांधी
११. छत्रपती शिवाजी महाराज
१२. नेताजी सुभाषचंद्र बोस ”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अं. शा. घार्गे,**
शासनाचे सहसचिव.

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 25th February 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No.BPA.0813/CR.141/EXC-2.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*), (*f*) and (*k*) of sub-section (*2*) of section 143 of Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953 as follows :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Amendment) Rules, 2015.

2. In rule 25 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953 (hereinafter referred to as "the Principal Rules")

(*A*) in sub-rule (*2*)—

(*i*) in clause (*b*), after the words "from any educational or religious institution" the words "or any Statue of National Personality" shall be inserted;

(*ii*) in Explanation, in para (*iii*),—

(*1*) in clause (*b*), for the words " or depot." the words " or depot, or " shall be substituted;

(*2*) after clause (*b*), the following clause shall be added, namely :—

" (*c*) The mid-point of the nearest gate of the Statue, if there is a compound wall, and if there is no compound wall, the nearest point of foundation of such a Statue."

(*iii*) After para (*iii*), the following para shall be added, namely :—

" (*iv*) " Statue of National Personality" means any statue of the National Personality recognized by the Government and specified in the Schedule appended to these rules.";

(*B*) in sub-rule (*3*), in clause (*a*), after the words " any institution" the words "and any Statue of National Personality" shall be inserted.

3. In rule 45 of the principal Rules, in sub-rule (*1C*),—

(*i*) after the words " any National or State Highway " the words " or Statue of National Personality" shall be inserted ;

(*ii*) in the proviso, after the words, brackets and figures " the Bombay Foreign Liquor (Amendment) Rules, 1990" the words, brackets and figures, " and the Maharashtra Foreign Liquor (Amendment) Rules, 2014" shall be added;

(*iii*) in the Explanation,—

(*a*) in para (*iii*),—

(*1*) in clause (*c*), at the end the word "or" shall be added;

(*2*) after clause (*c*), the following clause shall be added, namely :—

"(*d*) the mid-point of the nearest gate of the statue, if there is a compound wall, and if there is no compound wall, the nearest point of foundation of such a statue." ;

(*b*) after para (*iii*) the following para shall be added, namely :—

"(*iv*) "Statue of National Personality" means any statue of the National Personality recognized by Government specified in the Schedule appended to these rules."

3. In the principal Rules, after Form F.L.III, the following Schedule shall be inserted, namely :—

" *Schedule*

[*see* rule 25(2) and 45 (1C]

*National Personality*

1. Mahatma Phule,
2. Lokamanya Tilak,
3. Mahatma Gandhi,
4. Pandit Jawaharlal Nehru,
5. Dr. Babasaheb Ambedkar,
6. Acharya Vinoba Bhave,
7. Sant Tukadoji Maharaj,
8. Swatantraveer Savarkar,
9. Swami Ramanand Teerth,
10. Indira Gandhi,
11. Chhatrapati Shivaji Maharaj,
12. Netaji Subhashchandra Bose ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. GHARGE,
Joint Secretary to Government.